# Media Monitor

| | | |
|---|---|---|
| **Publication:** | **Afternoon D & C** | |
| **Edition: Mumbai** | **Date: 12.01.2017** | **Page No: 07** |

# ROAR




Pics: Azad Shrivastav | ADC



Seen here are Mr. Pritish Nandy, Founder, Pritish Nandy Communications, Shri. Kamal Morarka, Chairman, World Trade Centre, Shri. Uddhav Thackeray, Executive President, Shiv Sena Party, Mr. Bittu Sahgal, Editor, Sanctuary Asia and Mr. Vijay Kalantri, President, All India Association of Industries (AIAI) at the release of Shri. Kamal Morarka's wildlife photography book titled 'ROAR'

Shri. Kamal Morarka created 'ROAR' is a collection of wildlife photographs taken by him over the past 20 years. The images were taken at various wildlife sanctuaries across India and even at a few abroad. Bagwagad in Madhya Pradesh, Kanha National Park, Pench National Park, Bharatpur Bird Sanctuary and Gir in Gujarat, are some of the captivating locations where the wildlife images were shot.

Images of tigers, a favourite in the animal kingdom for Shri. Morarka, feature heavily in the stunning collection. A rare image in the book is the treasured photograph of the Siberian Cranes. The image was taken long before the days of environmental change and degradation that have sadly curbed the beautiful birds annual migration to India from the Arctic Tundra regions.

'ROAR' is published by Sanctuary Magazine and the event was hosted by the Sanctuary Nature Foundation.

The book has a preface by Mr. Pritish Nandy and an introduction by Mr. Bittu Sahgal.

At the event, Shri.Thackeray, launched 'ROAR' and congratulated Shri. Morarka on the stunning captures.

# Media Monitor

| Publication: | Divya Marathi | |
|---|---|---|
| Edition: Mumbai | Date: 12.01.2017 | Page No: 07 |



# 'मित्रों' शब्दाची आज वाघाएवढी भीती वाटते

## पंतप्रधान मोदी यांच्यावर उद्धव ठाकरे यांची टीका

विशेष प्रतिनिधी | मुंबई

'मी कायम मराठीत बोलतो, हिंदीत आज भाषण करताना सुरुवात सुचत नाही. पण मी 'मित्रों' शब्द काही उच्चारणार नाही. 'मित्रों' शब्दाची लोकांना आज



खऱ्या वाघाइतकी भीती वाटते. हा शब्द उच्चारताच लोक पळून जातात, अशी बोचरी टीका शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केली.

नरिमन पॉइंट येथील हॉटेल ट्रायडंट येथे कमल मोरारका यांच्या 'रोअर-वॉक थ्रू द वाइल्ड लाइफ' या पुस्तकाचे प्रकाशन उद्धव यांच्या हस्ते बुधवारी झाले. या वेळी व्यासपीठावर प्रख्यात लेखक प्रीतीश नंदी, वन्यजीव क्षेत्रातील कार्यकर्ते बिट्टू सहगल आणि पुस्तकाचे लेखक कमल मोरारका हजर होते.

मोदी यांचा नामोल्लेख न करता ठाकरे म्हणाले, 'वाघ वाघिणीला कधी छेडत नाही. भूक लागल्याशिवाय तो शिकारही करत नाही. माणूस मात्र अमर्याद अन्न साठवतो, छेडछाडही करतो, तरीही आपण स्वतःला सिव्हिलाइज्ड कसे समजतो,' असा प्रश्न त्यांनी विचारला. 'वाघ वाचवायचे असतील तर 'वाघाला' मदत करा,' असेही उद्धव उपस्थितांना म्हणाले.

'शहरात हवा शुद्ध व्हावी म्हणून आज आपण मशीन लावतो. त्याच वेळी हवा शुद्ध करणारी झाडे मात्र तोडून टाकतोय. नवी झाडे लावायचे सोडा, आहेत ती तरी जगवा,' असे आवाहन त्यांनी या वेळी केले. 'म्हणूनच शिवसेना मुंबईतील आरे कॉलनीत होणाऱ्या मेट्रो कार शेडला विरोध करतेय,' असा खुलासाही उद्धव यांनी आपल्या भाषणात केला. 'कमल'चे हे पुस्तक पाहून मला हेवा वाटला. पूर्वी मी हाती कॅमेरा घेऊन जंगलं हिंडायचो. राजकारणामुळे आता वेळ नाही मिळत, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. तसेच मुंबई महापालिकेने परदेशातून प्राणिसंग्रहालयात आणलेल्या पेंग्विनसंदर्भात होत असलेल्या टीकेचा त्यांनी जोरदार समाचार घेतला.

## चहावाल्याचं कायमच ऐकण्यात येतंय

'सध्या शिवसेनेत खूप लोक येत आहेत, त्यामुळे मला वेगळा पत्ता देण्याची गरज नाही वाटत. पण आजकाल 'त्या' चहावाल्याचं कायमच ऐकण्यात येतंय,' असा टोला ठाकरेंनी मोदींना लगावला.

# Media Monitor

| Publication: | DNA | |
|---|---|---|
| Edition: Mumbai | Date: 12.01.2017 | Page No: 11 |

careful now



We wonder what Shiv Sena chief Uddhav Thackeray is telling author Kamal Morarka to watch out for at the latter's book launch in Mumbai on Wednesday — EMMANUAL YOGINI

# Media Monitor

| | | |
|---|---|---|
| **Publication:** | **Free Press Journal** | |
| **Edition: Mumbai** | **Date: 13.01.2017** | **Page No: 18** |


## 'Roar' released by Shiv Sena's Uddhav Thackeray



Uddhav Thackeray, executive president, Shiv Sena Party releasing a wildlife photography book titled 'Roar'- a walk through the wild by Kamal Morarka. The event was attended by Pritish Nandy, Founder, Pritish Nandy Communications; Kamal Morarka, chairman, World Trade Centre; Bittu Sahgal, Editor, Sanctuary Asia and Vijay Kalantri, President, All India Association of Industries (AIAI) recently.

# Media Monitor

| Publication: | Loksatta-Mumbai Vruttant | |
|---|---|---|
| Edition: Mumbai | Date: 14.01.2017 | Page No: 08 |


# वन्यजीव संवर्धनात सर्वांचा सहभाग आवश्यक

## उद्धव ठाकरे यांचे आवाहन; 'रोअर' छायाचित्र पुस्तकाचे प्रकाशन

**प्रतिनिधी, मुंबई**

**निसर्ग, वन्यप्राणी** आणि वन्यजीवन हा आपला अमूल्य ठेवा असून त्याच्या जतन आणि संवर्धनाच्या कामात प्रत्येकाने सहभागी व्हावे, असे आवाहन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बुधवारी मुंबईत केले. सेंच्युरी फाऊंडेशनतर्फे नरिमन पॉइंट येथील ट्रायडंट हॉटेलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात ठाकरे यांच्या हस्ते कमल मोरारका यांच्या 'रोअर' या वन्यप्राणी व वन्यजीवनावरील छायाचित्रांच्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. त्यानंतर ते बोलत होते. सोहळ्यास मोरारका यांच्यासह प्रीतीश नंदी, बिट्टू सहेगल उपस्थित होते.

निसर्ग, वन्यप्राणी आणि वन्यजीवन हे आपले वैभव आहे. आपण एखादे झाड लावले नाही तरी चालेल पण असलेली झाडे तोडू नका. विकासाच्या नावावर आपण पर्यावरण, जंगले नष्ट करत असून ते रोखणे आवश्यक आहे. अन्यथा भावी पिढीला वाघ, जंगल हे फक्त छायाचित्रातच पाहावे लागेल, असेही ठाकरे यांनी सांगितले.

जंगलातून वाघीण चालली आहे आणि वाघांनी तिची छेडछाड केली असे कधीही पाहायला मिळत नाही.

पण माणसांकडून मात्र छेडछाड घडते. आपण जंगलातल्या प्राण्यांना पशू म्हणतो पण खरे पशू तर आपण माणसेच आहोत. जंगलातल्या प्राण्यांनी माणसांमधील या पशूंवर पुस्तक लिहिले पाहिजे, असे ठाकरे म्हणाले.

नंदी यांनी सांगितले, मोरारका यांनी पुस्तकातून वन्यप्राणी आणि वन्यजीवनाचे वैभव खुले केले आहे. ते पाहून सध्याच्या काळात आपण काय गमावत आहोत याची जाणीव होते. त्यादृष्टीनेही हे पुस्तक महत्त्वाचे आहे. तर बिट्टू सहेगल यांनी जंगलांशिवाय जीवन व्यर्थ आहे. निसर्गाचा नाश म्हणजे पर्यायाने मानवाचा नाश असे सांगितले.



### 'मित्रो'ची भीती

भाषणाची सुरुवात मराठीत बंधूनो आणि भगिनींनो अशी केली तर काही वाटत नाही. पण हिंदीतून बोलताना मात्र पंचाईत होते. कारण 'भाईयो', 'मित्रो' असे म्हटले की हल्ली लोक पळून जातात. वाघाला जितके घाबरत नाही तितके लोक आता या शब्दांना घाबरायला लागले आहेत, असा टोला ठाकरे यांनी कोणाचेही नाव न घेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लगावला.

# Media Monitor

| Publication: | MID-DAY | |
|---|---|---|
| Edition: Mumbai | Date: 12.01.2017 | Page No: 08 |




# *malavika's mumbai*



**THE DAILY DISH :**
Send all your news, views
You can follow her on twit



Uddhav Thackeray at the launch of the book. **PIC/BIPIN KOKATE**

## The tiger's roar

SHIV SENA chief **Uddhav Thackeray** appeared to borrow a leaf from his father Bal Thackeray's book, when he employed the arsenal of biting wit to demolish perceived political rivals at the launch of industrialist and president of the Samajwadi Janata Party, the multi-faceted **Kamal Morarka's** wildlife photography book, Roar: A walk through the wild,' yesterday.

"These days I do not have to begin my speech with the word 'Roar,' the tiger's cub had said in chaste Marathi, alluding to the book's title to an audience consisting of the likes of **Pritish Nandy**, **Vijay Kalantri**, **Mahendra Sanghi** and **Bittu Sahgal** (who had moderated a discussion with Morarka). "I only have to say mitron as it is equally dangerous," he is reported to have said to much laughter.

This when you think about it, could be further indication of the so called widening chasm between Maharashtra's ruling allies, and its implication on the forthcoming municipal elections!

# Media Monitor

| **Publication:** | **Saamana** | |
|---|---|---|
| **Edition: Mumbai** | **Date: 12.01.2017** | **Page No: 03** |

# आम्ही टायगर आहोत, टायगरच्याच गोष्टी करणार!

## 'रोर-द वॉक थ्रू द वाईल्ड लाईफ' पुस्तकाचे उद्धव ठाकरे यांच्या हस्ते प्रकाशन

मुंबई, दि. ११ (प्रतिनिधी) - वाघ हा केवळ एक प्राणी नसून ती जंगलाची शान आहे. त्यामुळे वाघाला वाचवलेच पाहिजे. ती आपली जबाबदारीच आहे. आम्हीही 'टायगर' आहोत. त्यामुळे 'टायगर'च्याच गोष्टी करणार, अशा शब्दांत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आज ठणकावले. मात्र काहीजण वाघाची साथ द्यायला तयार नसल्याचा टोलाही त्यांनी लगावला.

उद्योगपती कमल मोरारका यांच्या वन्य प्राण्यांच्या छायाचित्रांवर आधारित 'रोर-द वॉक थ्रू द वाईल्ड लाईफ' पुस्तकाचे प्रकाशन उद्धव ठाकरे यांच्या हस्ते मुंबईतील ट्रायडंट हॉटेलमध्ये आयोजित कार्यक्रमात झाले यावेळी ते बोलत होते. वाघ भूक लागेल तेव्हाच शिकार करतो. मात्र आपण आपल्या गरजेनुसार जंगल साफ करीत चाललो आहोत. यावेळी होणाऱ्या विरोधाकडेही आपण पाहत नाही. वाघांना तर आपण वाचवलेच पाहिजे, मात्र आपण पर्यावरणाचा ऱ्हास करीत चाललो आहोत. हे असेच चालू राहिले तर पुढच्या पिढीला काय वाघ पिंजऱ्यात राहतो म्हणून सांगणार का, असा सवालही त्यांनी केला. पुस्तक प्रकाशने भरपूर होत असतात. मात्र वाईल्ड लाईफवर पुस्तक काढणे कठीण असल्याचे सांगताना कमल मोरारका यांच्या पुस्तकाबद्दल गौरवोद्‍गार काढले. जगभरातील जंगलातील वाघ, सिंह आणि जिराफासारख्या प्राण्यांचे केलेले छायाचित्रण कौतुकास्पद असल्याचे ते म्हणाले.

### विकासाच्या नावाखाली झाडांची कत्तल

अलीकडेच पर्यावरणमंत्री रामदास कदम यांच्या हस्ते एका मशीनचे उद्‍घाटन झाले. हवेतील प्रदूषण खेचून मुंबईकरांना शुद्ध हवा देणारे हे मशीन आहे. अशा मशीन मुंबईत लावायलाच हव्या. मात्र निसर्गाने आपल्याला झाडांच्या रूपाने शुद्ध हवा देणाऱ्या मशीन दिल्या आहेत. मात्र मुंबईत सध्या विकासाच्या नावाखाली झाडांची कत्तल सुरू असल्याचा टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला. मेट्रो कारशेडसाठी झाडांची कत्तल करण्यात येणार आहे. ती झाडे नाहीत का, असा सवालही त्यांनी केला.

### *'मित्रों, भाईयों' ऐकले की लोक पळतात*

*हल्ली 'मित्रो', 'भाईयों' हे शब्द ऐकले की लोक अक्षरशः पळून जातात, हे मी पाहिले आहे. त्यामुळे मी आता 'मित्रों', 'भाईयों' हे शब्द उच्चारणेच सोडून दिलेय. आता मी जेव्हा भाषण करतो तेव्हा 'देवियों', 'सज्जनों' असे सांगताच उपस्थितांमध्ये एकच हशा उडाला. आजकाल सगळीकडे चायवाल्याचे बोल ऐकायला येत आहेत. त्यामुळे चायवाल्याचेही ऐकले पाहिजे असा टोलाही त्यांनी लगावला.*



उद्योगपती कमल मोरारका यांच्या वन्य प्राण्यांच्या छायाचित्रांवर आधारित पुस्तकाचे प्रकाशन करताना शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे. सोबत माजी खासदार प्रीतीश नंदी, बिट्टू सहगल, विजय कलंत्री.

### वाईल्ड लाईफ शहरात आहे

वाघाची मादी एकटी चालली असताना दोन-चार वाघांनी तिची छेडछाड केली असा प्रकार कधी होत नाही. मात्र बंगळुरूमध्ये घडलेल्या प्रकाराने खरे वाईल्ड लाईफ तर शहरातच आहे असे म्हणावे लागेल असेही उद्धव ठाकरे यांनी सांगितले. आपण मात्र त्यांनाच वाईल्ड म्हणतो आणि स्वतःला नागरिक समजतो. त्यांनीच आपल्यावरच्या पुस्तकाचे प्रकाशन केले पाहिजे असेही ते म्हणाले.

### काहीजण अपुऱ्या माहितीवर बोलतात

मुंबईत आणलेल्या पेंग्विनना बर्फाची गरज नाही. हे पेंग्विन जर मुंबईतल्या आणि देशभरातील मुलांना पाहायला मिळाले तर त्यांना त्यांच्याबद्दल प्रेम निर्माण होईल. त्यांच्याबद्दल अधिक जाणून घेता येईल. मात्र काही जण सध्या अपुऱ्या माहितीवर काहीही बोलत सुटले आहेत. जर कुणी चांगले करीत असले तर त्यांना करूच द्यायचे नाही अशीच भूमिका असल्याची टीकाही त्यांनी केली.

■ निसर्गाला इन्कम टॅक्स लागत नाही. नोटाबंदीचाही प्राण्यांवर काही परिणाम होत नाही. कारण जंगलाचा एक वेगळाच कायदा आहे. या कायद्याचा आपण आदर करायला हवा. नवीन झाडे लावणे शक्य नसेल तर असलेली झाडे तरी आपण वाचवायला हवी, असे आवाहनही उद्धव ठाकरे यांनी केले.

# Media Monitor

| Publication: | Sakaal Times | |
|---|---|---|
| Edition: Mumbai | Date: 12.01.2017 | Page No: 05 |

## TIGER TRAIL

Pic: Prashant Sawant




Shiv Sena Executive President Uddhav Thackeray at the launch of Kamal Morarka's wildlife photography book 'Roar' in Mumbai on Wednesday.

# Media Monitor

| Publication: | The Asian Age | |
|---|---|---|
| Edition: Mumbai | Date: 12.01.2017 | Page No: 03 |




Shiv Sena party president Uddhav Thackeray (R) with Indian businessman Kamal Morarka (L) launching the wildlife photography book, *Roar*, authored by Kamal Morarka, in Mumbai on Wednesday. — *THE ASIAN AGE*